**ठळक बातम्या**

कल्याणकारी विकासासाठी सरकार वचनबद्ध असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

येत्या १५ जुलैपासून रेल्वेचे तत्काळ तिकीट आरक्षित करण्यासाठी प्रवाशांना आधार संलग्न ओटीपी नोंदवणं बंधनकारक

जागतिक कसोटी क्रिकेट स्पर्धेच्या विजेतेपदासाठी लंडनमधे लॉर्ड्स मैदानावर ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिका यांची लढत सुरु

**आणि**

पुढचे दोन-तीन दिवस विदर्भात मुसळधार पावसाची शक्यता, विदर्भातल्या बहुतांश जिल्ह्यांमध्ये ऑरेंज अलर्ट

**<><><><><>**

कल्याणकारी विकासासाठी सरकार वचनबद्ध असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज म्हटलं आहे. कामगार आणि रोजगार मंत्री डॉ. मनसुख मांडवीय यांच्या समाजमाध्यमावरच्या संदेशाला उत्तर देताना प्रधानमंत्र्यांनी, सरकारने सुरू केलेल्या विविध कल्याणकारी योजना जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत पोहोचतील, याची खात्रीही दिली.

भारताचं सामाजिक सुरक्षा कवच गेल्या दहा वर्षांमध्ये १९ टक्क्यांवरून ६४ पूर्णांक ३ दशांश टक्क्यापर्यंत वाढलं आहे. आयलोस्टॅट या आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या ताज्या आकडेवारीनुसार, गेल्या दशकात ४५ टक्के वाढ दिसून आली आहे. भारतातले ९४ कोटींहून अधिक जणांना आता किमान एका सामाजिक संरक्षणाचा लाभ मिळत आहे. सामाजिक संरक्षण मिळणाऱ्या लाभार्थ्यांच्या संख्येच्या बाबतीत भारत आता जगात दुसऱ्या क्रमांकावर आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारत जगातली चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनल्याचा अभिमान वाटतो, अशी भावना केंद्रीय नागरी उड्डाण मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी आज नाशिक इथे व्यक्त केली. या सरकारमुळे आज देशात विमानतळांची संख्या १६२ झाली असून येत्या काळात होणाऱ्या कुंभ मेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिकच्या विमानतळाचा विकास करण्यात येणार असल्याची घोषणा मोहोळ यांनी यावेळी केली.

<><><><><>

महायुतीचं सरकार सत्तेवर आल्यानंतर केलेल्या पहिल्या शंभर दिवसांच्या कामामुळे सुस्त प्रशासन कामाला लागलं असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी म्हटलं आहे. अकोला इथं आयोजित कार्यकर्ता संवाद संमेलनात ते आज बोलत होते.

प्रशासनाला यानंतर दीडशे दिवसांचं लक्ष्य दिलं असून नागरिकांना शासकीय कामं व्हॉट्स अपवरूनच करता यावीत अशी व्यवस्था केली जाणार असून यासाठी व्हॉट्स अपशी करार केला जाणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. २५ वर्षापासून रखडलेली सिंचनाची कामं २०२७ पर्यंत पूर्ण केली जातील. वैनगंगा-पैनगंगा या महत्त्वाकांक्षी नदीजोड प्रकल्पामुळे अकोला, अमरावती, बुलडाणा, यवतमाळ आणि वाशिम या जिल्ह्यातील जमीन ओलिताखाली येणार आहे, असं मुख्यमंत्री म्हणाले.

<><><><><>

येत्या १५ जुलैपासून रेल्वेचे तात्काळ तिकीट आरक्षित करण्यासाठी प्रवाशांना आधार संलग्न ओटीपी नोंदवणं बंधनकारक असणार आहे. IRCTC ॲप किंवा IRCTC वेबसाइटवरुन तत्काळ तिकीट आरक्षित करताना प्रवाशांचा आधार संलग्न ओटीपीची नोंद करणं आवश्यक असेल. रेल्वेनं आज यासंदर्भातलं पत्रक

प्रसिद्ध केलं. याशिवाय ज्या खात्यावरुन तत्काळ तिकीट आरक्षित केले जाणार आहे ते खातं देखील आधार संलग्न असणे आवश्यक असेल. याची अंमलबजावणी १ जुलैपासून होणार आहे.

तिकीट खिडकी किंवा रेल्वेच्या अधिकृत एजंटकडून तात्काळ तिकीट आरक्षित करताना तिकीट काढण्यासाठी दिलेल्या मोबाइल क्रमांकावर आलेला ओटीपीची पडताळणी १५ जुलैपासून आवश्यक असेल.

तात्काळ तिकीटांचं आरक्षण सुरू झाल्यावर पहिल्या अर्धा तासात रेल्वे एजंटांना तत्काळ तिकीट आरक्षित करता येणार नाही, असा निर्णयही रेल्वे मंत्रालयानं आज जाहीर केला.

**<><><><><>**

मुंबई - गोवा राष्ट्रीय महामार्गावरची वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी पर्यायी मार्गांचे रुंदीकरण तसंच दुरुस्ती करण्याचा निर्णय उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली आज मुंबईत झालेल्या बैठकीत झाला. इंदापूर, माणगाव बायपास रस्त्यांचं काम पूर्ण होईपर्यंत वाहतूक कोंडी  टाळण्यासाठी चार पर्यायी मार्गांची कामं करण्याचे निर्देश पवार यांनी दिले.

**साताऱ्यातल्या** राजघाट परिसरातल्या शाहू महाराज, महाराणी येसूबाई यांच्या समाधीस्थळांचं संवर्धन करण्याचा निर्णय आज अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत झाला. यासोबतच अजिंक्यतारा किल्ला परिसरातल्या राजसदरेचं पुनर्निर्माण, तलावांचं संवर्धन, तटबंदीची, मुख्यद्वाराची दुरुस्ती, भग्नावस्थेतील बुरुजांचा, पुरातन वास्तूंचा जीर्णोद्धार करण्याचा निर्णयही झाला.

**सिंधुदुर्ग** जिल्ह्यातल्या राजकोट किल्ल्यावरल्या पुतळा परिसरात भव्य आरमार तसंच पर्यटन केंद्र उभारण्याचा निर्णयही या बैठकीत घेण्यात आला.

**रायगड** जिल्ह्यातल्या हरिहरेश्वर, मारळ आणि श्रीवर्धनच्या पर्यटन विकासासाठीचे प्रस्ताव केंद्र सरकारच्या प्रसाद योजनेसाठी पाठवण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज दिले. तसंच पर्यटन विकास आराखड्यांसाठी आवश्यक सर्व मंजुरीचे टप्पे पूर्ण करून तातडीने कार्यवाही सुरू करायला उपमुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

विकसित कृषी संकल्प अभियानांतर्गत कृषी विज्ञान केंद्र परभणी आणि वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या वतीने परभणी जिल्ह्यामध्ये पूर्णा तालुक्यात आव्हाई इथे शेतकरी संवाद कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात शेतकऱ्यांना स्थानिक पातळीवर पिकणाऱ्या नगदी पिकांविषयी शास्त्रज्ञांनी संपूर्ण मार्गदर्शन केलं. या कार्यक्रमाविषयी परभणीचे शेतकरी जळबाजी बुचाले यांनी अधिक माहिती दिली.

**होल्ड बाईट - जळबाजी बुचाले**

**<><><><><>**

जागतिक कसोट क्रिकेट स्पर्धेच्या विजेतेपदासाठी, आज लंडनमधे लॉर्ड्स मैदानावर ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिका यांचा सामना सुरु झाला. दक्षिण आफ्रिकेनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला. ऑस्ट्रेलियाची सुरुवात खराब झाली. त्यांचे आघाडीच्या फळीतले फलंदाज झटपट बाद होत गेले. उपाहारापर्यंत त्यांनी ४ गडी गमावून ६७ धावा केल्या. सलामीवीर उस्मान ख्वाजाला तर भोपळाही फोडता आला नाही. मात्र त्यानंतर स्टीव्हन स्मिथनं ब्यू वेबस्टरच्या साथीनं डाव सावरला.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा ऑस्ट्रेलियाच्या ५ बाद  १४६ धावा झाल्या होत्या.

<><><><><>

सातारा जिल्हा चित्रपट आणि मालिकांच्या चित्रीकरणासाठी अत्यंत पोषक असून त्यासाठी धोरणात्मक निर्णय घेऊन प्रोत्साहन देण्याचा विषय शासनाच्या विचाराधीन असल्याचं सांस्कृतिक कार्यमंत्री आशीष शेलार आज सांगितलं. ते आज साताऱ्यात संघटनात्मक प्रवास आणि सांस्कृतिक कार्य विभाग आयोजित शाहिरी महोत्सवाच्या समारोप प्रसंगी बोलत होते. चित्रपट, मालिका व्यवसायातले तज्ज्ञ आणि लोकप्रतिनिधी यांच्याशी चर्चा करून शासन याबाबत धोरण तयार करेल, असंही ते म्हणाले.

<><><><><>

सोलापूर जिल्ह्यातल्या करमाळा मतदारसंघाचे माजी आमदार जयवंतराव जगताप यांनी शिवसेनेत प्रवेश केला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत मुंबई इथं त्यांचा प्रवेश झाला. जगताप हे १९९० आणि २००४ अशा दोन वेळा विधानसभेवर निवडन आले होते. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हा पक्ष प्रवेश महत्त्वाचा  मानला जात आहे.

<><><><><>

शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी, दिव्यांगांना सहा हजार मानधन अशा मागण्यांसाठी अन्नत्याग आंदोलनाला  बसलेल्या माजी  राज्यमंत्री बच्चू कडू यांची प्रकृती खालावली आहे. कडू यांच्या आंदोलनाचा आज चौथा दिवस आहे. अमरावतीचे जिल्हाधिकारी आणि जिल्हा पोलीस अधीक्षकांनी बच्चू कडू यांची भेट घेत आंदोलन मागे घेण्याची विनंती केली. जिल्हाधिकाऱ्यांच्या विनंतीनंतर  कडू यांनी रक्तदाबाची गोळी घ्यायला सुरवात केली आहे. मात्र, आपल्या मागण्या मान्य होत नाही तोपर्यंत आंदोलन मागे घेणार नसल्याचं त्यांनी स्पष्ट केलं आहे.

बच्चू कडू यांच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी गोंदियामधल्या नवेझरी इथं शेतकऱ्यांनी अन्नत्याग आंदोलन सुरू केलं आहे. तर बच्चू कडू यांच्या मागण्या

मान्य कराव्यात अशी मागणी करणारं पत्र बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांना लिहिलं आहे.

**<><><><>**

लग्न जुळवून देण्याच्या नावाखाली आर्थिक फसवणूक करणाऱ्या सात जणांच्या टोळीला बीड जिल्ह्यात अटक करण्यात आली आहे. आष्टी तालुक्यातल्या कारखेल बुद्रुक गावात एका तरुणाचं लग्न जुळवण्यासाठी काही लोकांनी पावणे सहा लाख रुपये घेतले होते. मात्र नवरी मुलगी लग्नानंतर तरुणाकडे राहायला येत नाही हे पाहून आपली फसवणूक झाल्याचं त्यांच्या लक्षात आलं. वडवणी इथल्या एका ऊसतोड कामगार तरुणाकडूनही या टोळीने लग्न जुळवण्यासाठी तीन लाख रुपये घेतले. मात्र नवरी मुलगी लग्नानंतर दोनच दिवसात पळून गेली. या प्रकरणी तपास केला असता फसवणूक करणारी टोळी पोलिसांच्या हाती लागली. नागरिकांनी खात्री झाल्यानंतरच लग्न करावं असं आवाहन पोलिसांनी केलं आहे.

**<><><><>**

येत्या २-३ दिवसात विदर्भात मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. विदर्भातल्या बहुतांश जिल्ह्यांमध्ये पुढचे ३ दिवस ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. या कालावधीत विजांचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची आहे.

उत्तर महाराष्ट्र आणि मुंबई महानगर क्षेत्र वगळता संपूर्ण राज्यात यलो अलर्ट दिला आहे.